# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७ /( ३२२/ ०७) विशि-४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) चा कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सत्र २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(विद्या विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली-४४२६०५ फोन नंबर ०७१३२ - २२३३२३

गोंविग/ विद्या /क्र/ ३६३ /२०२३ दिनांक २६/०७/२०२३

## // कार्यशाळेची सुचना //

**संदर्भ** :- मा. संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे पत्र क्र.युएनआय/(१३६/२२)/विशि-१/भाग-२/८०५६ दि. १३/०७/२०२३

विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे मा. संस्थाचालक, प्राचार्य व IQAC समन्वयक यांना कळविण्यात येते की, शासन पत्र दि. १६ जुन, २०२३ अन्वये राज्यातील सर्व अकृषि विद्यापीठांच्या कुलगुरुंना विद्यापीठ विभाग, स्वायत्त महाविद्यालये, आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम शिकविल्या जात असलेल्या महाविद्यालयामध्ये शासन निर्णय दि. २० एप्रिल, २०२३ व शासन निर्णय दि. १६ मे, २०२३ नुसार अंमलबजावणी करण्याचे कळविण्यात आलेले आहे. दि. २९ जुलै, २०२३ या दिवशी भारतीय शिक्षणामध्ये आमुलाग्र बदल करण्याऱ्या शैक्षणिक धोरणास तीन वर्ष पुर्ण होत असल्यामुळे या दिवसाचे औचित्य साधून राज्यातील सर्व अकृषि विद्यापीठामध्ये व संलग्नित महाविद्यालये तसेच स्वायत्त महाविद्यालयामध्ये **दि. २४-२९ जुलै, २०२३ या कालावधीत "राष्ट्रीय शैक्षणिक धोरण सप्ताह"** म्हणुन साजरा करण्याचे योजिले आहे. या अनुषंगाने मा. कुलगुरु महोदयांचे अध्यक्षतेखाली खालील प्रमाणे कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलेले आहे. तसेच सदर कार्यशाळेला विभागीय मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपुर हे मार्गदर्शन करणार आहेत.

**दिनांक :- २८ जुलै, २०२३**
**वेळ :- दुपारी १.०० वाजता.**
**स्थळ :- जुन्या इमारतीतील सभागृह , गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**

करीता वरील प्रमाणे सर्व संलग्नीत महाविद्यालयाचे मा. संस्थाचालक, प्राचार्य व IQAC समन्वयक यांनी कार्यशाळेला उपस्थित राहून सहकार्य करावे, हि विनंती.

(डॉ.अनिल हिरेखण)
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतिलिपी:-**

१. मा. कुलगुरु महोदय, यांचे स्विय सहाय्यक यांना माहीतीस्तव सविनय सादर.
२. मा. प्र-कुलगुरु, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहीतीस्तव सविनय सादर.
३. सिस्टीम ॲनालिस्ट यांनी सदर कार्यशाळेची सुचना विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिदध करण्याची कार्यवाही घ्यावी.
४.कनिष्ठ अभियंता (इलेक्ट्रीक) यांनी सदर कार्यशाळेकरीता विजतंत्री यांना इलेक्ट्रीक व्यवस्थेकरीता अवगत करुन द्यावे.